ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, बेलापूर नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी क्रमांक -०२२-२७५६०३११ ई - मेल directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र. कावि/धोरणात्मक निर्णय/PMAYG-१/८८४/२०१९ दिनांक : ०८/०८/२०१९

प्रति,
**मुख्य कार्यकारी अधिकारी ,**
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय - मृत लाभार्थ्यांचे घर वारसास हस्तांतर करण्याच्या प्रक्रियेबाबत**

**संदर्भ** - राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण कार्यकारी समिती सभा दि. २०/७/२०१९ चा कार्यवृत्तांत.

उपरोक्त विषयान्वये लाभार्थी मृत झाल्यानंतर त्याच्या पूर्ण किंवा अपूर्ण असलेल्या घरकुल हस्तांतरण करावयाच्या कार्यवाहीबाबत क्षेत्रिय स्तरावरुन वारंवार विचारणा केली जात होती. प्रचलित पध्दतीनुसार लाभार्थी मयत झाल्यास त्याच्या घरकुलाचा ताबा वारसास देण्याकरिता Succession Act, १९२५ ५ (१) नुसार कार्यवाही करण्यात येते. सदर कार्यवाहीकरिता अंदाजे चार ते पाच महिन्यांचा कालावधी आणि रक्कम रु. १० ते १५ हजार पर्यतचा खर्च येत असलेबाबत आपल्या स्तरावरुन कळविण्यात आले होते.

या सर्व बाबींचा विचार करुन प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थी मृत झाल्यास सदर लाभार्थ्यांच्या वारसास घरकुल योजनेअंतर्गत लाभ देणेकामी उपरोक्त संदर्भान्वये विषय क्र. १२ मांडण्यात आला होता. सदर विषय खालीलप्रमाणे -

अ ) <u>लाभार्थी मयत झाल्यानंतर त्याचा वारस उपलब्ध असल्यास</u> -

लाभार्थ्यांचे मृत्यू प्रमाणपत्र, कुटुंबातील पत्नी / पती हयात असल्यास त्याच्यासह इतर वारसांचे रुपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर संमतीपत्रक / ना हरकत प्रमाणपत्र २ साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह ग्रामपंचायतीस सादर करुन वारस नोंद करण्याबाबतचा अर्ज संबंधितांनी करावा. ग्रामपंचायतीने सदर अर्ज सर्व कागदपत्रांसह ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्ड वर लावून १५ दिवसांची मुदत घेऊन इतर कुणाचे आक्षेप / हरकती येतात का हे तपासावे. आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर अर्ज सर्व कागदपत्रांसह ग्रामसभेसमोर ठेवून वारस निश्चितीचा ठराव पारित करावा. जर आक्षेप प्राप्त झाले तर संबंधित पक्षकारांची सुनावणी घेऊन ग्रामपंचायतीच्या अभिप्रायासह सदर प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह ग्रामसभेसमोर ठेवून वारस निश्चितीचा ठराव पारित करावा. तथापी काही कारणांमुळे वारस निश्चिती करण्यास अडचणी येत असतील तर संबंधितांना Court Succession Certificate अनिवार्य करावे.

ग्रामसभा ठराव पारित झाल्यांनतर ग्रामपंचायतीने संबंधित वारसाचे नाव ग्रामसभा ठराव व कागदपत्रांसह गटविकास अधिकारी , पंचायत समिती यांना कळवावे. गटविकास अधिकारी यांनी सदर प्रस्तावाची तपासणी करुन अभिप्रायासह वारसाचा प्रस्ताव मंजूरीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे पाठवावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर वारसास मंजूरी देताना "केवळ घरकुल लाभासाठीच मंजूरी देण्यात आली" असलेबाबत नमूद करावे.

Scanned by CamScanner

ब ) <u>लाभार्थी मयत झाल्यानंतर त्याचा वारस उपलब्ध नसल्यास</u> -

लाभार्थीस कायदेशीर वारस उपलब्ध नसल्यास सदर बाब ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्ड वर नमुद करुन हरकती वा आक्षेप यांच्यासाठी एक महिना कालावधी द्यावा. सदर कालावधीत कोणतीही हरकत वा आक्षेप प्राप्त न झाल्यास ग्रामपंचायतीने सदर विषय आगामी ग्रामसभेकरिता निश्चित करावा. यामध्ये ग्रामपंचायतीने प्रतिक्षा यादीतील शिल्लक लाभार्थ्यांपैकी दिव्यांग / वयोवृध्द / एकल महिला यांना प्राधान्याने लाभ देण्यास प्रस्तावित करावे. जर प्रतिक्षा यादीत लाभार्थी शिल्लक नसेल तर अशा घरकुलाचा वापर सार्वजनिक प्रयोजन (वाचनालय, बचतगट बैठका इ. ) करिता करावा. जर आक्षेप प्राप्त झाले तर संबंधित पक्षकारांची सुनावणी घेऊन ग्रामपंचायतीच्या अभिप्रायासह सदर विषय ग्रामसभेकरिता निश्चित करुन ठराव पारित करावा.

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत सदर विषयावर कार्यवाही करणेबाबत प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रक्रिया अंतिम होईपर्यत वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात यावी.

सदर विषयास अनुसरुन ठराव क्र. १२७ खालीलप्रमाणे पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.१२७** - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत सदर विषयावर अंतिम कार्यवाही होईपर्यत वरीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

तरी उपरोक्त विषय व ठरावान्वये आपले स्तरावरुन उचित कार्यवाही करावी. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत सदर विषयान्वये कार्यवाही प्रस्तावित केल्यास त्यानुरूप आपणास अवगत करण्यात येईल.

सदर प्रकिया राज्य पुरस्कृत योजनांकरीता देखिल लागू राहील.

(सही) 3/8/2019

**धनंजय माळी (भा.रा.से.)**
**संचालक**

प्रत -

१. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव.
२. उपआयुक्त (विकास), विभाग सर्व यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.

Scanned by CamScanner